# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- २८२ दिनांक :- ०५/१०/२०२१

## वसई-विरार परिसरातील नागरिकांकडुन करोडो रुपयाची गुंतवणुकी स्विकारुन फसवणुक करुन दुबई येथे पळुन गेलेल्या आरोपीत यांस आर्थिक गुन्हे शाखेकडुन अटक.

माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर १९५/२०२१ भा.द.वि. कलम ४२०,४०६,३४ तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील हितसंबंधाचे संरक्षण) १९९९ चे कलम ३,४ प्रमाणे दिनांक- २१/०५/२०२१ रोजी १३:१० वा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक अनंत पराड, नेम. आर्थिक गुन्हे शाखा, मि.भा.व.वि यांचेकडे देण्यात आला होता.

आरोपीत १) अमित कांतीलाल जैन रा. रो हाऊस नं.०४, क्लस्टर-०७, स्पॅनिश बिला, चिंचोटी गाव, नायगाव पुर्व, ता.वसई, जि.पालघर २) योगेश विजय भालेराव रा.बी/७०४, साईप्रभा कॉम्पलेक्स, वसंतनगरी वसई ता.वसई जि.पालघर यांनी **Aaj Edu Plus Consultancy Pvt.Ltd** नावांची कंपनी पत्ता तुंगारेश्वर स्वीट मार्टच्या वर रेल्वे स्टेशन वसई पश्चिम येथे सुरु करुन वसई-विरार परिसरातील नागरिकांना गुंतवणुकदारांना त्यांचे गुंतवणुकीवर २५ ते ५० टक्के असे भरघोस व्याज देण्याचे अमिष दाखवुन २१५ गुंतवणुकदार यांचेकडुन एकुण ८,७१,४१,६४८/- रुपये गुंतवणुक केलेली रक्कम गुंतवणुकदार यांना परत न करता गुंतवणुकदारांची करोडो रुपयाची फसवणुक करुन पळुन गेलेले होते.

वर नमुद गुन्हयातील आरोपीत हे अपहरीत रक्कम घेवुन दुबई व मुंबई येथे फरार झाले होते. नमुद आरोपीत यांची माहिती मिळणेकामी ब्युरो ऑफ इमिग्रेशन,दिल्ली यांना पत्र देवुन तसेच आरोपीत यांचे बाबत तांत्रिक तपास करुन तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक अनंत पराड व पो. अंम/ २६५२ संभाजी कदम यांना आरोपीत अमित जैन हा चिचोटी येथे आल्याची बातमी मिळाल्याने त्यांनी सापळा लावुन आरोपीत अमित कांतीलाल जैन यांस दिनांक २०/०९/२०२१ रोजी अटक केली तसेच फरार आरोपीत

योगेश विजय भालेराव हा दुबई येथुन भारतात आले बाबत ब्युरो ऑफ इमिग्रेशन,दिल्ली यांचेकडुन माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक अनंत पराड, पो.अंम/ २६५२ संभाजी कदम यांना आरोपीत योगेश भालेराव हा उंबरगांव गुजरात येथे असल्याची माहिती बातमीदार यांचेकडुन मिळाल्याने तात्काळ उंबरगांव येथे जावुन आरोपीत योगेश भालेराव यांस दिनांक ०२/१०/२०२१ रोजी ताब्यात घेतले. तसेच आरोपीत अमित जैन याने फसवणुकीच्या रक्कमेतुन चिचोटी वसई येथे विकत घेतलेले ५० लाख रुपये किंमतीचा रो-हाऊस बंगला तसेच आरोपीत योगेश भालेराव याने जेजुरी जि.पुणे येथे रेल्वे स्टेशन जवळ विकत घेतलेली १ गुंठा जागा, १२ लाख रुपये किंमतीची गुन्हयाचे तपासकामी जप्त/ संरक्षित करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), पद्‌मजा बढे, सहायक पोलीस आयुक्त (आर्थिक गुन्हे शाखा), यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक,अनंत पराड, पो. अंम. /२६५२ संभाजी कदम यांनी केली आहे.

------oooo-------